PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Shabas sunbai
Year: 1986

Song: Sukh he vaate have have
Lyricist:

सुख हे वाटे हवे हवे
सुख हे वाटे हवे हवे
आज प्रीतीचे फूल उमलले
गंध नवे अन् रंग नवे
सुख हे वाटे हवे हवे

कळली नव्हती मजला प्रीती
या प्रीतीची रीत कोणती
आ...
कळली नव्हती मजला प्रीती
या प्रीतीची रीत कोणती
तरीही नकळत जुळूनी आले
मनोगताचे गीत नवे

सुख हे वाटे हवे हवे
आज प्रीतीचे फूल उमलले
गंध नवे अन् रंग नवे
सुख हे वाटे हवे हवे

शब्दा वाचून उमले भाषा
हृदयी अनोख्या फुलल्या आशा
शब्दा वाचून उमले भाषा
हृदयी अनोख्या फुलल्या आशा

जीव घेत असे उंच भरारी
जसे ढगांचे नभी थवे

सुख हे वाटे हवे हवे
आज प्रीतीचे फूल उमलले
गंध नवे अन् रंग नवे
सुख हे वाटे हवे हवे

आता न वळूनी मागे पाहीन
पुढती पुढती अशीच जाईन
आ...
आता न वळूनी मागे पाहीन
पुढती पुढती अशीच जाईन
दूर जांभळया क्षितिजी जेथे
स्वर्ग धरे ते जुळती दुवे

सुख हे वाटे हवे हवे
आज प्रीतीचे फूल उमलले
गंध नवे अन् रंग नवे
सुख हे वाटे हवे हवे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*